सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/परीक्षा शुल्क माफी/२०२६/3013
दिनांक : 04 NOV 2026

प्रति,
संचालक/प्राचार्य
तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या
सर्व स्वायत्त संस्था, अमरावती विभाग, अमरावती

विषय : अवर्षण/दुष्काळग्रस्त भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत...

संदर्भ : १. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२६/प्र.क्र.८२/मदत/२, दि.२५.०९.२०२६
२. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/२०२६/८३१ दिनांक १४.१०.२०२६
३.विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/परीक्षा शुल्क माफी/२०२६/२७९७ दिनांक १६.१०.२०२६
४.संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/२०२६/८८४ दिनांक ३.११.२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय क्रमांक १ नुसार,सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger -१ (प्रथम कळ) लागू झालेल्या ३४ जिल्ह्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन सदर तालुक्यांतील रहिवाशी असलेल्या शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या सवलतीचा समावेश आहे.

त्याअनुषंगाने मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे संदर्भ क्र.२ व ३ चे पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या स्वायत्त संस्थामधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीबाबतची माहिती "विवरणपत्र अ" मध्ये विभागीय कार्यालयास सादर करावयाची आहे. तरी, सदर माहिती विभागीय कार्यालयास सादर करावी जेणेकरुन अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत पुढील कार्यवाही विभागीय कार्यालयास करणे शक्य होईल.

(डॉ.ए.बी.बोराडे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत : **मा.संचालक**,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

"विवरणपत्र - अ"

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था

सन २०२६-२७ च्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतच्या तपशिलाचे विवरणपत्र

अ.क्र.	सन २०२६-२७ च्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या	ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्तीसाठी आवश्यक रक्कम	सन २०२६-२७ च्या दृष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या	ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्तीसाठी आवश्यक रक्कम	एकूण विद्यार्थी	एकूण प्रतिपूर्तीची रक्कम

स्वाक्षरी

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवासी आहेत. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही, याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील (----------विद्यार्थी संख्या) व (---------- रक्कम) एवढी आहे.

सही/-